नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक:१०/०४/२०२६

पुणे महानगरपालिका
मा. स्थायी समिती
कार्यपत्रिका क्र.३

मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार, दि.१६/०४/२०२६ रोजी, सकाळी ११:३० (अकरा वाजून तीस मिनिटे) वाजता मा.स्थायी समिती सभागृह , दुसरा मजला, पुणे महानगरपालिका (नवीन विस्तारित इमारत) येथे** भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

मा. सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र. ५४

मा.सुनिल नामदेव पांडे यांचे दि.०९/०४/२०२६ रोजीचे पत्र

पुणे मध्यवर्ती भागामध्ये भयंकर वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक कोंडी कमी करणेकामी खराडी-शिवणे रस्ता जोडण्यासाठी डेक्कन येथून येणारा नदीपात्रातील रस्ता पुढे एरंडवणे येथील म्हात्रे ब्रिज खालून कर्वेनगर येथील कै. राज्या मंत्री डी. पी. रस्ता (एरंडवणे एस.टी.पी. प्लांट समोर) यास जोडणे हे अत्यंत गरजेचे व अत्यावश्यक आहे. या कामासाठी पुणे पेठ, एरंडवणे येथील सर्वे नं. ३ पै या जमिनीचे तातडीने भूसंपादन करणे आवश्यक आहे.

त्यामुळे सदर मिळकतीचे भूसंपादन अथवा जमीन मालकाशी तडजोडीने संपादन करण्यास मान्यता देण्यात यावी, अशी विनंती सदर ठरावाद्वारे करण्यात येते.

सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

विषय क्र.५५

३ ते ४ वर्षांची रोपे लागवडीकरिता पुरविणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. जय गणेश डेव्हलपर्स यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५९९९९४६/- पेक्षा ६.६६% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु ५६००३४९=६० उपलब्ध रकमे पर्यंत (हॉर्टीकल्चर विषयक देखभाल दुरुस्तीची काम असल्याने भाववाढ सूत्र वगळून काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत. मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/उद्यान/११, दि. ०८/०४/२०२६ चे पत्र.

विषय क्र.५६

'राजीव गांधी प्राणीसंग्रहालय येथे प्राण्यांच्या खाद्यासाठी फळे व भाजीपाला पुरवठा करणे' कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. गुरुराज एंटरप्राईजेस यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.७६७०४२२=५० पेक्षा २.००% जास्त दराने) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु.७८२३८३०=९५ पर्यंत काम करून घेणेसाठी निविदा अटी शर्तीनुसार त्यांचेबरोबर करार करणेस तसेच 'ब' पाकीट उघडलेचे दिनांक २६/०२/२०२६ पासून काम सुरु करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/उद्यान /१५, दि.०९/०४/२०२६ चे पत्र.

ठरवान्वये आलेले अभिप्राय

विषय क्र.५७

मा. स्मिता सुधीर कोंढरे, मा. सौ. वैशाली बनकर, मा. सुहास टिंगरे व मा. अमोल बालवडकर यांचे दि.११/०३/२०२६ चे पत्रावर झालेला मा. स्थायी समिती, पुणे मनपा ठराव क्र.१९८७ दि.१३/३/२०२६ अन्वये मागविण्यात आलेला मा.महा.आयुक्त यांचा जा.क्र.मआ/अतिक्रमण/१४, दि.०९/०४/२०२६ चा अभिप्राय विचारासाठी.

मागील सभेचे विषय

विषय क्र.५८

पुणे नगर रस्त्यावरील फुटपाथची दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. B. N. CHAVAN यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८३३५३७७/- पेक्षा ३६.९९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५२५२१२१=०५ अधिक जी.एस.टी. र.रु.९४५३८२/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१२१०६१/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.४२२५५/- पर्यंत अशी एकुण र.रु.६३६०८१९=०५ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (३०-१०-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/२०५३, दि.२७/०३/२०२६ चे पत्र.

(टीप:- सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. ०९/०४/२०२६ च्या सभेत ठरले होते.)

संकीर्ण

विषय क्र.५९

पुणे पेठ कोंढवा बु. स.नं.५५ व ५६ मधील टिळेकर नगरकडे जाणा-या अस्तित्वातील ६.०० मी. रुंद रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २१० (१) (अ) अन्वये बांधकाम विकास विभागाने सादर केलेल्या नकाशात लाल रंगाने दर्शविल्यानुसार १२.०० मी. रुंदीची रस्ताप्रमाणरेषा निश्चित करणेस मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र./मआ/भूसंपादन/१३, दि.०९/०४/२०२६ चे पत्र.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका